# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः24.05.2024** **वारःशुक्रवार**

---

१.डोंबिवलीमध्ये रासायनिक कारखान्यातील स्फोटात आठ कामगारांचा मृत्यू, चौकशीचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

२.राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या दुर्घटनांमध्ये एसडीआरएफच्या तीन जवानांसह ८ जणांचा बुडून मृत्यू

३.लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यासाठीचा प्रचार थंडावला, पाचव्या टप्प्यात एकंदर ६२ पूर्णांक २ दशांश टक्के मतदान

४.स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या वतीनं यावर्षीचे पुरस्कार जाहीर आणि

५.काँग्रेस नेते, आमदार पी.एन. पाटील यांच्या पार्थिव देहावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

आता सविस्तर बातम्या

**<u>डोंबिवली स्फोट</u>**

डोंबिवली औद्योगिक वसाहत परिसरातल्या एका रसायन कंपनीत काल बॉयलरचा स्फोट होऊन लागलेल्या भीषण आगीत दोन महिलांसह आठ कामगारांचा मृत्यू झाला. तर साठ कामगार जखमी झाले आहेत. त्यांना उपचारांसाठी विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घटनास्थळी भेट दिल्यानंतर मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा केली. जखमींच्या उपचाराचा खर्च राज्य शासनातर्फे केला जाणार असल्याचंही शिंदे यांनी सांगितलं. या दुर्घटनेची सखोल चौकशी करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या उद्योगांचं इतरत्र स्थलांतर करण्यात येईल. दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला जाणार आहे असंही शिंदे यांनी घटनास्थळी भेट दिल्यानंतर पत्रकारांशी बोलताना सांगितलं. ही घटना दुःखद असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, कल्याणचे खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. तसंच एमआयडीसीतल्या वारंवार होणाऱ्या दुर्घटनांमुळे रहिवासी भागाला धोका निर्माण होतो. ही बाब लक्षात घेऊन अतिधोकादायक कंपन्यांचं कायमस्वरुपी स्थलांतर केलं जाईल असंही श्रीकांत शिंदे यावेळी म्हणाले. या दुर्घटनेनंतर उद्योग मंत्री उदय सामंत, आमदार निरंजन डावखरे यांनी खासदार श्रीकांत शिंदे आणि आमदार राजू पाटील यांच्या समवेत दुर्घटनेत जखमी झालेल्या रुग्णांची भेट घेतली.

**<u>दुर्घटना</u>**

अहमदनगर जिल्ह्याच्या अकोले तालुक्यातल्या सुगावजवळ काल प्रवरा नदीत नाव उलटून झालेल्या दुर्घटनेत एसडीआरएफच्या पथकातील ३ जवानांचा तसंच त्यांच्या समवेत असलेल्या एका स्थानिक नागरिकाचा बुडून मृत्यू झाला. प्रवरा नदीत सुगावजवळ बुधवारी दुपारी पोहण्यासाठी गेलेल्या दोघांचा मृत्यू झाला. त्यातील एकाचा मृतदेह हाती लागला होता. मात्र दुसरा मृतदेह न सापडल्यानं एस डी आर एफ च्या तुकड्या बोलविण्यात आल्या होत्या. काल सकाळी दुसऱ्या व्यक्तीच्या मृतदेहाचा शोध घेतांना ही दुर्घटना घडल्याची माहिती आपत्ती निवारण दलाच्या अधिकाऱ्यांनी दिली. या सर्व जवानांच्या कुटूबियांना दहा लाख रुपयांची मदत करण्यात येणार असल्याची माहीती पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

**<u>नाशिक दुर्घटना</u>**

नाशिक जिल्ह्यात आणखी एका दुर्घटनेत सिन्नर तालुक्यातील देवनदीवरील कुंदेवाडी इथल्या बंधाऱ्यात मित्रांसमवेत पोहण्यासाठी गेलेल्या सोळा वर्षांच्या दोन शाळकरी मुलांचा काल दुपारी बुडून मृत्यू झाला.

**<u>मैत्रिणी बुडाल्या</u>**

नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यातील बोरपाडा धरणात, बेडकी इथं राहणाऱ्या 16 वर्षीय दोन युवतींचाही बुडून मृत्यू झाल्याची घटना काल समोर आली. या मुली धरणाच्या काठावर आंघोळीसाठी गेल्या असता, पाय घसरून पाण्यात पडल्यानं ही दुर्घटना घडली.

**<u>उजनीबोट</u>**

उजनी धरणात मंगळवारी २१ मे रोजी झालेल्या नाव दुर्घटनेतल्या सहा जणांचे मृतदेह काल चाळीस तासांच्या शोधमोहिमेनंतर हाती लागले. मृतांमध्ये दोन लहान मुलं, दोन पुरूष आणि दोन महिलांचा समावेश आहे.

**<u>प्रचार समाप्त</u>**

लोकसभा निवडणुकीच्या सहाव्या टप्प्यासाठीचा प्रचार काल संध्याकाळी संपला. या टप्प्यात एकंदर ५८ मतदारसंघांमध्ये उद्या मतदान होणार आहे. या ५८ जागांसाठी एकोणनव्वद उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

सहाव्या टप्प्यासाठीचा निवडणूक प्रचार संपल्यानंतर आता विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी सातव्या आणि अंतिम टप्प्यातील मतदारसंघांकडे मोर्चा वळवल्यानं तिथं प्रचाराचा जोर वाढला आहे. सातव्या टप्प्यात ५७ मतदारसंघांमधे येत्या एक जूनला मतदान होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाराणसी मतदारसंघाचा त्यात समावेश आहे.

**<u>५वा टप्पा टक्केवारी</u>**

दरम्यान २० मे रोजी पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात एकंदर ६२ पूर्णांक २ दशांश टक्के मतदान झाल्याची अंतिम आकडेवारी काल निवडणूक आयोगाकडून देण्यात आली. या टप्प्यात पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक 78 पूर्णांक 45 शतांश टक्के तर बिहारमध्ये सर्वात कमी 56 पूर्णांक 76 शतांश टक्के मतदान झालं.

**<u>व्याख्यानमाला</u>**

**<u>– इंट्रो -</u>**

सातारा जिल्ह्यातील वाई इथं दरवर्षी आयोजित केल्या जाणाऱ्या, वसंत व्याख्यानमालेच्या ज्ञानसत्राचा समारोप नुकताच झाला.

राज्यभर व्याख्यानमालांचा कारभार आक्रसत असताना वाईमधील या २१ दिवसांच्या उपक्रमाला यंदा सलग १०८व्या वर्षी मिळत असलेला प्रतिसाद प्रशंसनीय आहे. प्रसारमाध्यमांचा फारसा बोलबाला नसतानाच्या काळात प्रबोधनाच्या हेतूनं वाईमध्ये शंकरराव जोशी यांनी त्याची पायाभरणी केली. सध्या लोकमान्य टिळक स्मारक संस्था त्याचं आयोजन करते. यंदाच्या ज्ञानसत्राविषयी माहिती देताना संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर शंतनू अभ्यंकर म्हणाले...

**<u>बुद्धपौर्णिमा</u>**

तथागत गौतम बुद्ध यांची जयंती काल राज्यभरात विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली. हिंगोलीमध्ये यानिमित्त डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला अभिवादन करुन फेरी काढण्यात आली. पुण्यात विश्वभुषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीनं धम्मपहाटचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळीबुद्ध-भीम गीतं सादर

करण्यात आली. पुण्यातल्या कोंढवा, हडपसर भागातही बुद्ध पौर्णिमेनिमित्त विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं. बुलडाणा जिल्ह्यातही धम्मवंदनेने तर गडचिरोलीत विविध सामाजिक संघटनांच्या वतीनं बुद्धजयंती साजरी झाली. नागपुरमध्ये दीक्षाभुमीवर तथागत बुद्धांना आदरांजली वाहून बुद्धवंदना घेण्यात आली.

**<u>पुरस्कार घोषणा</u>**

स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या वतीनं  देण्यात येणाऱ्या यावर्षीच्या स्वातंत्र्यवीर सावरकर पुरस्कारांची काल घोषणा करण्यात आली. पुरस्कारार्थींमध्ये   वीरचक्र प्राप्त कर्नल सचिन निंबाळकर, आय.आय.टी.इंदुरचे संचालक डॉक्टर सुहास जोशी, सावरकर विचार प्रसारक विद्याधर नारगोळकर यांचा समावेश आहे. अभिनेता रणदीप हुडा याला  'स्वातंत्र्यवीर सावरकर विशेष पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या १४१व्या जयंतीनिमित्त येत्या रविवारी २६ मे रोजी आयोजित कार्यक्रमात बिहारचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्या हस्ते या पुरस्कारांचं वितरण करण्यात येणार आहे.

**<u>ताडोबा गणना</u>**

चंद्रपूर जिल्ह्यातल्या ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात काल पौर्णिमेच्या लख्ख प्रकाशात आयोजित करण्यात आलेल्या प्राणी गणनेला निसर्गप्रेमींनी उत्तम प्रतिसाद दिला. ताडोबा बफर क्षेत्रात निसर्ग अनुभव या नावानं दरवर्षी हा उपक्रम राबवला जातो. यासाठी  करण्यासाठी निसर्गप्रेमींकरिता ८९ मचाणांची व्यवस्था करण्यात आली होती. 'बफर' क्षेत्रातल्या चंद्रपूर, मूल, मोहर्ली, खडसंगी, पळसगाव आणि शिवणी  या भागात उपक्रम राबवण्यात आला.

**<u>अंत्यसंस्कार</u>**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि कोल्हापूर जिल्ह्यातील करवीरचे आमदार पी एन पाटील यांच्या पार्थिव देहावर काल सडोली खालसा या त्यांच्या गावी काँग्रेस कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. आमदार पी. एन. पाटील  यांचं काल पहाटे  निधन झालं. ते ७१ वर्षांचे होते. १९७८ ते १९८५ या काळात जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष, त्यानंतर जिल्हा अध्यक्ष, प्रदेश काँग्रेस उपाध्यक्ष अशा जबाबदाऱ्याही त्यांनी सांभाळल्या.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी पाटील यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**<u>पाऊस नुकसान</u>**

छत्रपती संभाजीनगर विभागातील दुष्काळ आणि पाणीटंचाईच्या पार्श्वभुमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल आढावा घेतला. पिण्याच्या पाण्यास सर्वोच्च प्राधान्य, चारा उपलब्धतेच्या उपाययोजना आणि आगामी मॉन्सूनपूर्व उपाययोजना राबविण्याचे निर्देश त्यांनी यंत्रणांना दिले. विभागात ६८ तालुके आणि ३५४ महसूल मंडळांचा दुष्काळग्रस्त तालुके आणि मंडळ म्हणून समावेश करण्यात आला आहे.

रत्नागिरी जिल्ह्याच्या चिपळूण तालुक्यात सावर्डे आणि डेरवण परिसरात बुधवारी वादळी वाऱ्यासह पडलेल्या पावसामुळं अनेक मोठी झाडं पडली. त्यामुळे महावितरणचे १०० खांब पडले आणि वीजवाहक तारा तुटल्यानं हजारो ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित झाला. रत्नागिरी जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी ३९ पूर्णांक ५ मिलिमीटर मान्सूनपूर्व पाऊस झाला असल्याची माहिती जिल्हाधिकारी एम. देवेंदर सिंह यांनी दिली आहे .

**<u>हवामान</u>-**

जळगाव इथं काल सर्वाधिक 45 पूर्णांक 9 अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. मराठवाडा आणि विदर्भात सर्वच ठिकाणी पारा चाळीस अंशांच्या वर आहे.  दक्षिण कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. अन्यत्र उष्णतेची लाट कायम राहील.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.